# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :२० /०३ /२०२३

जावक क्र.लेखा/२९/कावि/९८ /२०२३

परिपत्रक

विषय:- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील महसुली/भांडवली देयकांच्या अदायगीबाबत..

सन २०२२-२०२३ चे सुधारीत व सन २०२३-२०२४ चे मुळ अंदाजपत्रकास मा.प्रशासक यांनी दि.१४/०३/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे. चालू आर्थिक वर्ष दि.३१/०३/२०२३ रोजी समाप्त होत असून त्यापूर्वी चालू आर्थिक वर्षातील देयकांची अदायगी करून चालू आर्थिक वर्षामध्ये विविध महसुली / भांडवली योजना व कामे यांना करणेत आलेल्या तरतूदी चालू आर्थिक वर्षामध्येच खर्ची टाकणे आवश्यक आहेत. अन्यथा सदर कामांचे / योजनांचे दायीत्व पूढील वर्षामध्ये जाण्याची शक्यता असून पुढील वर्षातील नियोजीत कामांना तरतूद अपूरी पडण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने सर्व संबंधीत विभागांनी चालू आर्थिक वर्षामध्ये ज्या महसुली/भांडवली योजना / विकास कामांना तरतूदी करणेत आलेल्या आहेत त्यांची देयके दि.३१/०३/२०२३ अखेर सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत लेखा विभागाकडे सादर करावीत. चालू आर्थिक वर्ष समाप्तीस कमी दिवस शिल्लक असल्याने सर्व संबंधीत विभागांनी दि.३१/०३/२०२३ पर्यंत सर्व साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कार्यालये चालू ठेऊन देयकांच्या अदायगीचे लेखा विषयक कामकाज पुर्ण करावे.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी